नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/०७/२०२५ (शनिवार)**

---

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद ६ लाख ७६ हजार ५० रूपयांचा मुद्देमाल जप्त १ आरोपी अटक, केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक ०४/०७/२०२५ रोजी केळवद पोलीस पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन केळवद समोर छिंदवाडा — नागपुर हायवे येथे नाकाबंदी केली असता टाटा झेस्ट कार क्र एम.एच ०१ सी. आर. २५६० ही नागपुर कडे येतांना दिसली. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आाला. वाहन चालक **आरोपी नामे आफताब अन्सार शेख, वय—३२ वर्ष, रा. वार्ड कं ४, डब्ल्यु सी एल कॉलनी, उमरेड, जि. नागपुर** याचे ताब्यातुन **१) इगल हुक्का शिशा तंबखु ब्रॅन्ड ४०० ग्रॅम वजनाचे एकुण १९८ कंपनी पॅकबंद पाकीटे, कि. .१,६८,३००/— रूपये ,२) होला हुक्का शिशा तंबखु ब्रॅन्ड १ किलोग्रॅम वजानाचे एकुण ७० कंपनी पॅकबंद पाकीटे, कि. ९२,७५०/—रूपये ३) टाटा झेस्ट कार क्र एम. एच ०१ सी.आर. २५६० किंमती ४,००,०००/—रूपये आणि ,४) एक विवो कंपनीचा ॲड्रॉईड फोन किंमती .१५,०००/—रूपये असा एकुण ६,७६,०५०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एकुण १४९.२०० किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु साठा जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथेभारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.**




## पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी यांचे कडून मोटार वाहन कायदयाअंतर्गत करण्यात आलेली कारवाई आणि अतिक्रमण काढले बाबत..

मा.श्री. डॉ. दिलीप पाटील–भुजबळ, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परीक्षेत्र नागपूर यांनी दि. ०४/०७/२०२५ रोजी  बी एम ए हॉल एमआयडीसी बुटटीबोरी येथे उद्योजकांची बैठक आणि जनता दरबार घेतला त्या बैठकीत उद्योजक श्री. वैभव मेहता नारायणा बिस्कीट कंपनी यांनी परीसरात मुख्य रोडच्या बाजुला अतिक्रमण करून चहापाण ठेले अतिक्रमण केल्याचे मुद्दा उपस्थित केला होता. त्या अनुषंगाने नागपूर बुटटीबोरी उद्योगिक क्षेत्र महामंडळ रस्ता लागतचे असलेले अतिक्रमण श्रीमती मनिषा एस आकुलवार, उपअभियंता म.औ.वि.म.उपविभाग क्रमाक –१ एमआयडीसी बुटीबोरी यांचे पथक आणि पोलीस पथक यांनी संयुक्तरित्या आज दि.

०५/०७/२०२५ रोजी नारायणा कंपनी जवळील एक पानठेला, चहानाश्ता दोन टप—या, व मोहरारजी कंपनी, समोरील चहा टपरीचे ठेले काढण्यात आले. त्याबाबत उद्योजक यांनी तात्काळ कार्यवाही केले बाबत समाधान व्यक्त केले आहे.

दि. ०५/०७/२०२५ चे एका वृत्तपत्रात समस्या या नवा गडी नवे राज्य की केवळ देखावा? पोलीसांचा कारभारावर प्रश्नचिन्ह अशा मथळाखाली बातमी प्रसीध्दी झाली असून त्यांअनुषंगाने एमआयडीसी बुटीबोरी या परीसरात पोलीस विभागा कडून वाहतूक नियमण व नियत्रंण सुरळीत करण्याकरीता एमआयडीसी नागपूर बुटीबोरी औद्योगिक क्षेत्राचे सबंधीत विभागाचे अधिकारी यांचेशी तसेच सेव्ह लाईफ फाउडेशन यांचे सोबत समन्वय साधुन वाहतूक पोलीस विभागा व्दारे विशेष मोहिम राबवून औद्योगिक परीसरातील मुख्य रस्तावरील पथदिवे लावण्यात आले, रोडवर येणारे झाडांच्या फांदयाचे कटाई करण्यात आली त्यानंतर संपूर्ण परीसरात वाहतूक साईन बोर्ड तसेच गती अवरोध बसविण्यात आले प्याराबोलींक मिरर तसेच रोडवर रिफ्लेक्टर लावण्यात आले आणि जे वाहन चालक वाहतूक नियमाचे उल्लघन करतांना मिळून आले त्यांचेवर वाहतूक पोलीसांकडून रोडचे शोल्डर वर पॉकिग करणारे वाहनावर कार्यवाही करण्यात आली तसेच विना हल्मेट व सिटबेल्ट व ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह कार्यवाही करण्यात आली. वर्षेनिहाय खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच प्रांणातिक अपघात मध्ये सुध्दा घट झालेली आहे.

वाहतूक पोलीस एमआयडीसी बुटीबोरी यांचे कडून मोटार वाहन कायदा अन्वये केलेली वाहतूक केसेसची तक्ता प्रमाणे माहीती

| अ.क्र. | वर्षेनिहाय माहीती | केलेलीकेसेस. |
|---|---|---|
| १ | ०१ जाने २०२३ ते ३० जुन २०२३ | २८८ |
| २ | ०१ जाने २०२४ते ३० जुन २०२४ | ३२३ |
| ३ | ०१ जाने २०२५ ते ३० जुन २०२५ | ९५१ |

## पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत डोंगरगाव येथील मोबाईल गहाळ झाल्याचे घटनेबाबत

दिनांक ०५/०७/२०२५ रोजी एका वृत्तपत्रात काटोल मध्ये मोबाईल चोरीचे सत्र कायम,तपासात दिरंगाईमुळे नागरिकांमध्ये नाराजी अशा मथळाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. दिनांक ०४/०७/२०२५ रोजी तक्रारदार नामे सुनील लिल्हारे, रा. नवापुर हे दिनांक ०४/०७/२०२५ रोजी रात्री ०८:०० वाजता डोंगरगाव येथे त्याचा मोबाईल गहाळ झाल्याबाबत तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशन काटोल येथे गेले असता ठाणे अंमलदार कर्तव्यावर हजर असलेल्या अंमलदारांने सदर माहीती पोलीस निरीक्षक श्री. रंजित शिरसाठ, प्रभारी अधिकारी काटोल यांना देवुन तात्काळ तक्रारदाराची तक्रार नोंद केली. तसेच त्यावेळी श्री रंजित शिरसाठ हे डोंगरगाव भागातच गस्त करीत असल्याने त्यांनी घटनास्थळी भेट दिली आणि तेथील स्थानिकांच्या मदतीने मोबाईलचा शोध घेतला परंतु रात्रीची वेळ असल्याने मोबाईल मिळुन आला नाही.तसेच तक्रारदार यांनी दिलेल्या तक्राराप्रमाणे तक्रार नोंदविण्यात आली असुन मोबाईल चा शोध सुरू आहे

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६६६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०५/०७/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६६६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३६ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण १०४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे १८ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २० आरोपी अशा एकुण १०० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे २० आरोपी अशा एकुण १३३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापरखेडा येथे ३४ आरोपी अशा एकुण १०१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे १६ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २४ आरोपी अशा एकुण ८५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १४३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन एकुण ६६६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**






पोलीस स्टेशन,रामटेक.





# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०४/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०५/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत नयाकुंड, माहुली येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री रमेश बरकते यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली.रामटेक उपविभागातील शिवाजी चौक, पारशिवणी ,जगनाडे चौक रामटेक, खात,अरोली आणि मनेगाव टेक, देवलापार येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. मो.वा.अधिनियम अन्वये १४ कारवाई करण्यात आल्या सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते. तसेच रात्र गस्त दरम्यान श्री रमेश बरकते यांच्या मार्गदर्शनात देवालापार पोलीसांनी पुसदा पुनर्वसन क्रं २ येथील आरोपी च्या घरून १०लिटर मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू असा मुद्देमाल जप्त करून म.दाका प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.







मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने